**मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर व मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेतीनिगडीत विविध कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता ई-निविदा (दुसरी वेळ) प्रक्रियामध्ये सोमवार दि. १६.१२.२०२४ ला सकाळी ११.०० वा. मा. संचालक, म.सं. कें, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे दालनामध्ये झालेल्या Pre bid बैठकीचा वृतांत**

मा. कुलगुरू महोदय तसेच मा. कुलसचिव, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचे निर्देशानुसार मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र वणी रंभापूर व मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला अंतर्गत प्रक्षेत्रावरील शेतीनिगडीत विविध कामे कंत्राटी पद्धतीने करण्याकरिता ई-निविदा प्रकिया राबविण्यात येत आहे. सदर ई-निविदा (दुसरी वेळ) दिनांक १०.१२.२०२४ रोजी ई-निविदा शासकीय संकेतस्थळावर व विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असून ई-निविदा वेळापत्रकानुसार दि. १६.१२.२०२४ ला सकाळी ११.०० वा. मा. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र यांचे दालनामध्ये मा. मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वनी रंभापूर, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचे अध्यक्षतेखाली Pre bid बैठक घेण्यात आली. सदर बैठकीचा वृतांत खालीलप्रमाणे-

१. या सभेकरिता खालील सभासद/अधिकारी तसेच कंत्राटदार उपस्थित होते.

| अ.क्र. | सभासद/अधिकारी यांची नावे | पदनाम |
|---|---|---|
| १ | डॉ. टी. एच. राठोड | अध्यक्ष तथा मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र (मप्राप्र), वणी रंभापूर |
| २ | डॉ. वर्षा व्हि. टापरे | संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र (मसंकें), डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ३ | डॉ. जि. जि. जाधव | उपसंचालक, मसंकें, अकोला |
| ४ | डॉ. एस. सि. नागपुरे | उप मुख्य बिजोत्पादन, मप्राप्र, वणी रंभापूर |
| ५ | डॉ. एम. डी. गिरी | प्रतिनिधी, विभाग प्रमुख, कृषि विद्या विभाग, डॉ. पंदेकृवि, अकोला |
| ६ | श्री. व्हि. एस. वाकोडे | लेखाधिकारी, मप्राप्र, वणी रंभापूर |
| ७ | श्री. एस. एस. सावलेकर | लेखाधिकारी, मसंकें, अकोला |
| ८ | श्री. व्हि. ए. तिवारी | तांत्रिक अधिकारी, मसंकें, अकोला |
| ९ | डॉ. एस. पि. पाटील | प्रभारी अधिकारी, विकास विभाग, मसंकें, अकोला |
| १० | श्री. आर. व्हि. झंझाड | सचिव तथा तांत्रिक अधिकारी, मप्राप्र, वणी रंभापूर |
| ११ | श्री. पि. एम. दिघाडे | प्रोप्रायटर, गोपाल सेक्युरिटीगार्ड सर्विसेस, यवतमाळ |
| १२ | श्री. सतीश वारोकर | अध्यक्ष, संकल्प बहुउद्देशीय संस्था, अकोला |
| १३ | श्री. सागर अत्तरकार | प्रतिनिधी, बीएसपिएफ संस्था |
| १४ | श्री. विवेक चोरे | संचालक, इनोत्रो मल्टी सर्विसेस |

२. या बैठकीत शासकीय संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निविदा (दुसरी वेळ) यावर विस्तृत चर्चा करण्यात आली, कंत्राटदारांनी ई-निविदेसह सादर करावयाचे विविध नमुने, दरपत्रक आणि अटी व शर्ती संबंधित उपस्थित निविदा उत्सुक कंत्राटदारांच्या शंकेचे निरसन करण्यात आले.

३. वस्तु व सेवा कर (GST) २% व आयकर टीडीएस १% संबंधी कंत्राट दारांमार्फात प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यानुसार असे सूचित करण्यात येते कि, वस्तु व सेवा कर (GST) २% व आयकर टीडीएस १% हे देयक रक्कमेवर कपात करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारास सदर कर कपातीचा त्रैमासिक परतावा दाखल (quarterly return) करून सदर कराचा परतावा मिळवता येईल.

४. प्रक्षेत्रावर कंत्राटदारामार्फत काम सुरु असतांना कंत्राटदार किंवा कंत्राटदराने नेमून दिलेले पर्यवेक्षक आढळून येत नसून संबंधित विभागाचे अधिकारी अथवा कर्मचारी संबंधित कामाचा पाठपुरावा व देखरेख करण्यामध्ये गुंतून राहत असल्याचे निदर्शनास आहे. त्याअनुषंगाने ई-निविदा समितीद्वारे निर्णय घेण्यात आला आहे कि, आदेश मिळालेल्या

कंत्राटदारास प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरु असतांना काम सुरळीत चालण्याचे दृष्टीने कंत्राटदार स्वत; अथवा पूर्णवेळ पर्यवेक्षक नेमून कामाचा सतत पाठपुरावा व देखरेख करणे बंधनकारक राहील. हे कार्यालय किंवा संबंधित विभागाचे कर्मचारी त्यामध्ये गुंतून राहणार नाही तर सुरळीत व वेळेत काम पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी हि कंत्राटदाराची राहील.

५. बैठकीत झालेल्या चर्चेनुसार ई-निविदा समितीद्वारे सूचित करण्यात येते कि, ई-निविदा प्रपत्र ब) मधील अ.क्र. २१ व प्रपत्र ड) मधील अ.क्र. १४ प्रक्षेत्रावरील पिक/फळबाग राखण करणे (१० हेक्टर/२४ तास) करिता दर सादर करतेवेळी ५ राखणदार/पहारेकरी अपेक्षित धरून त्यानुसार कंत्राटदारांनी दर सादर करावेत.

६. पिक नुकसान भरपाई बाबत विस्तृत उल्लेखाबाबत कंत्राटदारांमार्फात प्रश्न उपस्थित करण्यात आला त्याविषयी ई-निविदा समितीद्वारे सूचित करण्यात येते कि, पिक नुकसान भरपाई वसूल करण्याकरिता खालील बाबींचा समावेश असेल-

अ. पिकाचे वाण व बियाणे दर्जा

आ. नुकसान झालेले पिकाखालील क्षेत्र

इ. पिकाचे वाण व बियाणे दर्जा नुसार त्या वर्षाकरिता विभागाचे येणारे अपेक्षित हेक्टरी प्रति क्विंटल उत्पादन व मंजूर केलेले बियाण्याचे दर रुपये प्रति क्विंटल.

७. ई-निविदा सादर करण्याची व तांत्रिक दस्ताएवेज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक २३/१२/२०२४ राहील तरी ई-निविदा सूचनेत ज्या ठिकाणी ई-निविदा सादर करण्याची व तांत्रिक दस्तावेज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक २०/१२/२०२४ उल्लेखित असेल ते २३/१२/२०२४ वाचण्यात यावा. तसेच तांत्रिक ई- निविदा (Technical Envelop T-1) उघडण्याचा दिनांक २३/१२/२०२४ एवजी २६/१२/२०२४ हा राहील.

८. विद्यापीठातील विविध विभागाअंतर्गत निविदा प्रक्रीयेमध्ये शेतीकामाचे कमीत कमी दर सादर करतांना प्रचलित दरांपेक्षा अत्यल्प दर किंवा अवाजावी दर नमूद केल्याचे तसेच काही कंत्राटदार प्रक्रियेत अडथळा निर्माण होऊन सदर प्रक्रिया पूर्ण होऊ नये या दृष्टीने अवाजावी दर नमूद करून मंजूर दराप्रमाणे प्रत्यक्ष कामास असमर्थता दर्शवित असल्याचे विद्यापीठ प्रशासनाचे निदर्शनास आलेले आहे. त्याअनुषंगाने बैठकीत झालेल्या चर्चेनुसार ई-निविदा समितीद्वारे सूचित करण्यात येते कि, सदर ई-निविदेकरिता सादर करण्यात आलेले कमीत कमी दर हे विद्यापीठ मानांकनानुसार अपेक्षित दरांपेक्षा व प्रचलित दरांपेक्षा जास्त तफावत दर्शवित असल्यास सदर दर न्यूनतम देयकारास प्रथम न्यूनतम देयकार (L१) म्हणून ग्राह्य न धरण्याबाबत व दरपत्रक (commercial envelope C1) नाकारण्याचे आणि उर्वरित निविदाधारकांनमधून प्रथम न्यूनतम देयकार (L१) ग्राह्य धरण्याबाबतचे संपूर्ण अधिकार मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मप्राप्र, वनीरंभापूर व संचालक, मसंकें, डॉ. पंदेकृवि, अकोला तसेच ई-निविदा समिती यांनी राखुन ठेवलेले आहेत. तसेच प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्याबाबत निदर्शनास येत असल्यास सदर कंत्राटदारास काळ्या यादीत समाविष्ट करण्याकरिता विद्यापीठ प्रशासनाकडे प्रस्तावित करण्यात येईल.

९. बैठकीचे शेवटी उपस्थित कंत्राटदार यांनी त्यांचे शंकानिरशन झाल्याबाबत सकारात्मक टिप्पणी केली व अध्यक्ष ई-निविदा समिती यांनी उपरोक्त बाबी शासकीय संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत सूचना केली.

अध्यक्ष,

म.प्रा.प्र., वणी रंभापूर व म.सं.कें., येथील प्रक्षेत्रावरील शेतीनिगडीत विविध कामे कंत्राट पद्धतीने करणे

तथा मुख्य बिजोत्पादन अधिकारी

डॉ. पंदेकृवि, अकोला

Officer In Charge, Agricultural Research Station
Inward No. 524
Dt. 23/12/2024
Dr. P.D.K.V. Akola